महाराष्ट्र टाइम्स
पुणे शनिवार, १३ जानेवारी २०१८



एरंडवणे अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची माहिती घेताना हुतात्मा राजगुरू शाळेतील विद्यार्थी.

# अग्निशमन केंद्राला मुलांची भेट

**पुणे :** पंख सामाजिक संस्था आणि क्विकहील फाउंडेशन यांच्या शाळांगण उपक्रमाअंतर्गत हुतात्मा राजगुरू शाळेतील विद्यार्थ्यांना एरंडवणे अग्निशमन केंद्रातील संग्रहालयाची सफर आयोजित केली होती.

आग लागते म्हणजे वैज्ञानिक घटना नक्की काय घडते, आगीच्या बंबाला पाचारण कसे करायचे, अग्निशमन विभागाचा फोन नंबर काय?..आग विझवण्यासाठी बंबातून पाण्याचे फवारे कसे मारले जातात? विद्यार्थ्यांना पडलेल्या या आणि अशा अनेक प्रश्नांची अग्निशमन अधिकारी गजानन पाथ्रुडकर यांनी उत्तरे दिली.

पंख सामाजिक संस्थेच्या प्रमुख स्मिता आपटे आणि स्नेहल पाटील तसेच मुख्याध्यापिका शारदा शेटे या वेळी उपस्थित होत्या. आग लागू नये म्हणून आणि लागल्यास आपली सुजाण नागरिक म्हणून काय करावे, मनाचा समतोल राखून संकटाला सामोरे जाण्याचे सप्रयोग धडे देण्यात आले.

अग्निशमन दलाकडील वायरलेस अधिकारी वासुदेव एकबोटे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.